## निशाणी क्र. ६९ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १४ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १४ सुंदर जयराम गावकर हे दि. ११/०९/२०२० रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादीचे वारस हे वादी यांना पुरेशी माहिती न मिळाल्याने मुदतीत दाखल करणे अशक्य झाले. सदर दाव्याचे कामी तांत्रिक उणीव राहू नये म्हणून सदर प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर येणे न्यायपुर्ततेचे दृष्टीने महत्वाचे झाले आहे. सबब, सदर अबेटमेंट आदेश रद्द करून प्रस्तूत प्रतिवादी याचे वारस दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात दिलेले कारण योग्य व संयुक्तिक नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तूत प्रतिवादी क्र. १४ सुंदर जयराम गावकर हे दि. ११/०९/२०२०

रोजी मयत झाले आहेत असे दिसून येते. प्रस्तूत प्रतिवादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा वाटप व मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**–आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : देवगड ( बी.आर.पाटील )
दिनांक: ०७/०३/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.03.08 13:48:37 +0530